५५

(1)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८, करआकारणी व करसंकलन विभाग.

क्रमांक : करसंकलन/२/काप्रि/१३६/९१

दिनांक: ८/४/१९९१.

परिपत्रक,

विषय : केंद्र सरकार व रेल्वेच्या मालमत्तांवर सेवा आकार
[सर्व्हिस चार्जेस आकारणेबाबत]

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात केंद्र शासनाच्या व रेल्वेच्या मालमत्ता ठिकठिकाणी आहेत. या सर्व मालमत्तांवर आकारणी करणे जरुरीचे आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या मिळकतींवर यापूर्वीच आकारणी देखील झालेली असेल व त्यावर मिळकतकर आकारणीची बिले देखील इतर मिळकतींप्रमाणेच दिली असतील. अशा मिळकतींवर एकसूत्रता रहावी म्हणून धोरण ठरविणेत जरुरीचे आहे.

भारत सरकारच्या व रेल्वेच्या मालमत्तांवर मिळकतकराऐवजी सेवा आकार [Service charges] बृहन्मुंबई महानगरपालिका ज्या दराने आकारते त्या दराने आकारणी करावी असे महाराष्ट्र शासनाने सुचविले आहे. या संदर्भात मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेकडे पत्रव्यवहार करून मुंबई येथील रेल्वेच्या मिळकतींचे बाबतीत जो सर्वसाधारण कर आकारला जातो त्याची माहिती घेतली असता तो दर करपात्र मूल्याच्या [Ratable Value] २५.५०% इतका आहे. सदर दराच्या ४२% इतका सेवा कर [Service charge] रेल्वेच्या मालमत्तांच्या करपात्र मूल्यावर आकारणेत येतो.

या सर्व बाबींचा विचार करता केंद्र शासनाच्या व रेल्वेच्या मालमत्तांवर आकारणी करणेबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गत करणेत येत आहे.

१] ज्याप्रमाणे खाजगी निवासी मालमत्ता, फॅक्टरी मालमत्ता यावर करयोग्यमूल्य काढण्यासंदर्भात जे धोरण/ठरविलेले आहे त्याच धोरणांचा अवलंब करुन केंद्र शासन व रेल्वेच्या मालमत्तांवर करयोग्यमूल्य काढणेत यावे.

२] वरीलप्रमाणे आलेल्या करयोग्यमूल्यावर महापालिका सभेने विहित केलेल्या मिळकत कराचे दराप्रमाणे येणारा मिळकतकर करुन आकारता त्या दराचे ४२% इतकी रक्कम मिळकतकराऐवजी सेवा आकार [Service Charge] म्हणून बसविणेत यावा व त्याची वसुली करणेत यावी. बिलामध्ये मिळकतकर असे न लिहिता "सेवा आकार" असे नमूद करून बिले द्यावीत.

३] इतर कोणतेही कर आकारु नयेत.

४] सदरची आकारणी ही मिळकत भोगवटयात आली तेव्हापासून किंवा पिंपरी चिंचवड नगरपालिका स्थापन झालेपासून यापैकी जे वर्ष नंतरचे असेल त्या वर्षापासून करावी.

सही/xxx
[डॉ. नवीनचंद्र जैन]
आयुक्त,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.

प्रति,
मंडलाधिकारी, ________

प्रत : १] सहा. करआकारणी व करसंकलन अधिकारी
२] सहा. करवसुली अधिकारी.
३] करसंकलन टेबल क्र. :

८/४/९१
सहा. आयुक्त[कर]करिता.
पिंपरी-चिंचवड म.न.पा. पिंपरी

2

क्र:-आरईव्ही १०९९/९८६/प्र.क्र.१४/ल-५
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- /११/२०००.
30 NOV 2000

प्रति,

कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
मुंबई पुणे रस्ता, पिंपरी-४११ ०१८.

विषय:- केंद्र सरकारचे वापरातील खाजगी इमारती
वरील शिक्षण व रोजगार हमी कर वसूलीबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र. कर/८/कावि/५३३/९९ पिंपरी,
दिनांक २२/९/९९.

रश्मि जोशी
6430
4/12/2000
12/315
07/12/2000

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, केंद्र शासकीय विभागाने भाडयाने घेतलेल्या इमारतीमध्ये कर भरण्याची जबाबदारी सदर इमारतीचे मूळ मालकाकडे असल्याने, सदर इमारत किंवा इमारतीचा भाडयाने घेतलेला भाग कर माफीस पात्र नाही.

प्रकाश बर्वे

[ प्रकाश का. बर्वे ]
अवर सचिव
महसूल व वन विभाग.